सत्यमेव जयते

# एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय,

**महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई**
**(महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र राज्य)**
**रायगडभवन,सीबीडी,बेलापूर,नवी मुंबई 400614**
Email icdsest21@gmail.com Tel. No.022-27576388,322,323 Fax 022-27576324

---

**जाक्र/ एबाविसेयोआ/मुसे-मविप/पदो-को-नि.भरती /2024-25/** 2162 **/ नवी-मुंबई दिं: 25 APR 2025**

**अत्यंत महत्वाचे / कालमर्यादा**

**प्रति,**
**विभागिय उपआयुक्त,**
**महिला व बाल विकास,**
**कोकण,पुणे, नाशिक,छ.संभाजीनगर,**
**अमरावती व नागपूर विभाग .**

**विषय : सेविका ते मुख्यसेविका पदोन्नती कोटयातील निवडीने या प्रकारातील रिक्त पद भरती परिक्षा ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे बाबत -**

**संदर्भ** : 1. महाराष्ट्र शासन राजपत्र ,महिला व बाल विकास विभाग ,नविन प्रशासकिय भवन,मंत्रालय मुंबई दिनांक : 4 जून 2021
2. महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग ,नविन प्रशासकिय भवन,मंत्रालय मुंबई शासन अधिसुचना दिनांक : 8 मे 2023
3. महाराष्ट्र शासन ,महिला व बाल विकास विभाग ,मंत्रालय मुंबई शासन पत्र MWC-07011(12) /19/ 2022-DESK-7(-587170) दि. 8 एप्रिल 2024
4. महिला व बाल विकास विभाग , शासन पत्र क्र.मबाआ-2021/प्र.क्र.22/का-7 दि.5 सप्टेंबर-2024
5. या आयुक्तालयाचे पदोन्नती कोटयातील रिक्त पदभरती पत्र क्र.560 दिनांक 4 फेब्रूवारी 2025.
6. या आयुक्तालयाचे पदोन्नती कोटयातील रिक्त पदभरती पत्र क्र.2018 दिनांक 11 एप्रिल 2025

**उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते कि ,**

1. महिला व बाल विकास विभाग, एकात्मिक बाल विकास सेवा योजना महाराष्ट्र राज्य नवी मुंबई यांचे अधिनस्त 104 नागरी प्रकल्प कार्यालयातील संवर्ग गट -क मधील अंगणवाडी सेविका ते मुख्यसेविका पदोन्नती कोटयातील निवडीने भरावयाची पदे भरण्या बाबतची कार्यवाही आयुक्तालय स्तरावर चालू आहे . महिला व बाल विका स विभाग गट-क संवर्गातील सुधारित सेवाप्रवेश नियम दिनांक 4 जून 2021 , शासन धोरणा नुसार पदोन्नती कोटयातील भरावयाची पदे मर्यादित विभागिय परिक्षा व्दारे मानसेवी अंगणवाडी सेविका ते मुख्यसेविका / पर्यवेक्षिका "परिक्षा नियमावली" दिनांक 8 मे 2023, त्याच प्रमाणे उपरोक्त संदर्भ क्र. 3 व 4 चे दिनांक 8 एप्रिल 2024 व दि. 5 सप्टेंबर 2024 च्या शासन पत्र अन्वये दिलेल्या सुचना व आदेशा नुसार वरिल संदर्भिय अ.क्र. 6 चे या आयुक्तालयाचे सुधारित पत्रान्वये 104 नागरी प्रकल्प कार्यालयाचे अधिनस्त अंगणवाडी सेविका ते मुख्यसेविका पदोन्नतीस पात्र अंगणवाडी सेविका यांना पदोन्नती पात्र प्रमाणपत्र देणे बाबत कळविण्यात आलेले होते .त्याच प्रमाणे सदरील पदोन्नती कोटयातील रिक्त पदभरती कार्यक्रमा नुसार **अंगणवाडी सेविका ते मुख्यसेविका पदोन्नती पात्र अंगणवाडी सेविका यांचे दिनांक 30 एप्रिल 2025 ते 20 मे 2025 पर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत .**
2. तसेच सर्व 104 नागरी प्रकल्प कार्यालय प्रमूख यांनी त्यांचे अधिनस्त प्रकल्प कार्यालयातील पदोन्नतीस पात्र अंगणवाडी सेविका यांच्या निदर्शणास आणून देउन त्याची पोहोच दप्तरी ठेवण्यात यावी . सदर पदोन्नती परीक्षेच्या

अनुषंगाने संबंधित प्रकल्प अधिकारी हे पदोन्नतीस पात्र अंगणवाडी सेविका यांना ऑनलाईन फॉर्म भरणे संबंधी मार्गदर्शन करतील व दर दोन दिवसांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची नोंद घ्यावी . त्याच प्रमाणे पदोन्नतीस पात्र अंगणवाडी सेविका यांनी ऑनलाईन फॉर्म भरल्या नंतर ऑनलाईन भरलेल्या अर्जाची छायांकित प्रत सोबत संलग्न केलेले कागदपत्रांच्या छायांकित प्रती 2 प्रतीत संबंधित प्रकल्प कार्यालयाकडे जमा ठेवण्यात याव्यात .त्या नुसार प्रकल्प कार्यालयातील पदोन्नतीस एकूण पात्र संख्या, ऑनलाईन अर्ज भरलेल्या सेविकांची संख्या व प्रलंबीत संख्या यांचा मेळ प्रकल्प कार्यालयांनी ठेवावा व दिलेल्या विहित मुदतीत मुख्यसेविका पदोन्नतीस पात्र सेविका यांचे कडून ऑनलाईन अर्ज भरणे करिता संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी पाठपुरावा करावा .

3. विभागीय उपआयुक्त संबंधित हे त्यांच्या विभागातील नागरी प्रकल्प कार्यालयातील एकूण पात्र अंगणवाडी सेविका ते मुख्यसेविका या पदोन्नतीस पात्र सेविका यांचे कडून विहित मुदतीत अर्ज भरणे करिता वेळोवेळी आढावा घेउन विहित मुदतीत ऑनलाईन अर्ज भरणे बाबतची प्रक्रीया पुर्ण करून घ्यावी .

**सोबत :ऑनलाईन अर्ज भरणे सविस्तर सुचना पत्र**

**सदर प्रकरणी प्रथम प्राधण्याने कार्यवाही करण्यात यावी** .

**स्वाक्षरित XXXX**
कैलास पगारे, (**भा.प्र.से.**)
आयुक्त
एकात्मिक बाल विकास सेवा योजना
महाराष्ट्र राज्य ,नवी मुंबई.

**प्रत: माहिती व कार्यवाहीस्तव -**

1. मा.सचिव,महिला व बाल विकास विभाग , मंत्रालय मुंबई यांचे माहितीस्तव सविनय सादर .
2. बाल विकास प्रकलप अधिकारी , नागरी प्रकल्प सर्व 104 यांना कार्यवाहीस्तव

**स्थळप्रतीवर मा.आयुक्त महोदय यांची स्वाक्षरी असे** .

**अरविंद रामरामे**
सहाय्यक आयुक्त (प्रशासन)
एकात्मिक बाल विकास सेवा योजना
महाराष्ट्र राज्य ,नवी मुंबई.

# सर्व साधारण सुचना

**महाराष्ट्र शासन- महिला व बाल विकास विभाग.**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना महाराष्ट्र राज्य नवी मुंबई यांचे आस्थापनेवरील**
**मुख्यसेविका (नागरी प्रकल्प) संवर्ग गट - क पदोन्नती कोटा- निवडीने .**

## पद भरती अधिसुचना -2025

1. महिला व बाल विकास विभाग एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत मुख्यसेविका गट-क संवर्गातील पदोन्नती कोटयातील निवडीने एकुण 272 रिक्त पदांच्या भरती करीता 104 नागरी प्रकल्प कार्यालयात कार्यरत असणाऱ्या अंगणवाडी सेविका व मीनी अंगणवाडी सेविका, ज्यांची 1 जानेवारी -2025 रोजीच्या दिनांकास 10 वर्षे विनाखंड नियमित सेवा झालेली आहे व सद्यस्थितीत कार्यरत आहे, अशा पात्र महिला उमेदवाराकडून या विभागाच्या icds.gov.in या संकेतस्थळावर फक्त ऑनलाईन पध्दतीने **दि. 30.04.2025 रोजी 11.00 वाजले पासून ते दि. 20.05.2025 रात्री 23.55 वा.पर्यंत या कालावधीत अर्ज मागविण्यात येत आहेत.** सदर पदांच्या भरतीकरीता महाराष्ट्रातील निश्चित केलेल्या परीक्षा केंद्रावर व एकाचवेळी ( Computer Based Test) ऑनलाईन परीक्षा घेण्यात येईल.
2. प्रस्तुत परीक्षेमधून महाराष्ट्र राज्यातील बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) प्रकल्पांतर्गत **पदोन्नती कोटयातील निवडीने** गट- क संवर्गातील मुख्यसेविका यांची 272 पदे भरण्यांत येणार आहेत.
3. **परीक्षा दिनांक** :- याबाबतची माहिती icds.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच उमेदवारांच्या ऑनलाईन प्रवेशपत्रकाव्दारे कळविण्यात येईल. प्रस्तुत जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीची पुर्तता करणा-या उमेदवाराकडून शासनाच्या ऑनलाईन प्रणालीव्दारे अर्ज 104 नागरी प्रकल्प कार्यालया मार्फत मागविण्यात येत आहे.

**4. पदसंख्या व आरक्षणा संदर्भात सर्वसाधारण तरतुद :-**

4.1 **पदसंख्या व आरक्षणामध्ये शासनाच्या सुचने नुसार बदल (कमी / वाढ) होण्याची शक्यता आहे.**

4.2 पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल झाल्यास याबाबतची सुचना वेळोवेळी विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या घोषणा /सुचनांच्या आधारे प्रस्तुत परीक्षेमधुन भरावयाच्या पदाकरीता भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.**परीक्षा स्थगिती करणे, रदद करणे, अटी व शर्ती मध्ये अंशत: बदल करणे, पदांच्या एकुण व प्रवर्ग निहाय पद संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार मा.अध्यक्ष,राज्यस्तरीय निवड समिती तथा मा.आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई व समन्वय समिती यांचे कडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत.**

4.3 प्रस्तुत जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर तसेच परीक्षेचा निकाल अंतिम करे पर्यत नव्याने प्राप्त होणा-या मागणीपत्रामध्ये मागास प्रवर्ग तसेच संमातर आरक्षणाची पदे उपलब्ध होण्याची तसेच विद्यमान पदसंख्येमध्ये बदल (कमी/वाढ) होण्याची शक्यता नाकारता येत नाही , त्यावेळी **मा. आयुक्त तथा अध्यक्ष राज्यस्तर निवड समिती यांचा निर्णय अंतीम राहील .**

4.4.महिला व बाल विकास विभाग अधिसुचना दि.04/06/2021 नुसार मुख्यसेविका/पर्यवेक्षिका या पदाचे सेवा प्रवेश नियम निश्चित करण्यात आलेले आहेत.त्यामधील तरतुदीनुसार **मुख्यसेविका गट-क या संवर्गाची 100% पदे फक्त महिला उमेदवार या मधूनच भरली जातील.** महिलासाठी आरक्षित पदांकरीता अर्ज करणा-या उमेदवारानी महाराष्ट्र राज्याचे अधिवासी (Domicile) असल्याबाबत प्रमाणपत्र सादर करावे. तसेच महाराष्ट्र शासन, महिला व बाल विभाग,शासन निर्णय क्र.महिआ-2023/प्र.क्र.123/कार्या-2/दि.4/05/2023 अन्वये खुल्या गटातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरती निवडी करीता नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची अट रद्द करणेत आलेली आहे.

4.13 **अराखीव (खुला) उमेदवाराकडून विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषा संदर्भातील अटीची पुर्तता करणा-या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारासह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशी करीता विचार होत असल्याने सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित /उपलब्ध नसले तरी ,अर्जा मध्ये त्यांचा मुळ प्रवर्गा संदर्भातील माहिती अचूकपणे नमुद करणे बंधनकारक आहे.**

**4.14. दिव्यांग आरक्षण :**

4.14.1: दिव्याग व्यक्ती हक्क अधिनियम 2016 च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.दिव्यांग-2018/पत्रक्र-114/16-अ/दिनांक 29 मे 2019 , महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र. दिव्यांग-2019/प्र.क्र.79/ का-7/ मंत्रालय मुंबई दि. 5 जुलै 2021 , शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.दिव्यांग-2022/प्र.क्र-83/16-अ/दिनांक 20 एप्रिल 2023 तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणा संदर्भात नियमानुसार पदे भरण्यात येतील .त्या बाबतचा तपशिल सोबतच्या परिशिष्ट -3 मध्ये सविस्तर तपशिल देण्यात आलेला आहे.

4.14.2: महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग , एकात्मिक बाल विकास सेवा योजना च्या विभागांतर्गतच्या विविध संवर्गा करिता दिव्यांगाची पदे सुनिश्चित करण्यात आलेली आहेत . सदरचा तपशिल सोबतच्या परिशिष्ट तीन प्रमाणे मुख्यसेविका पदाचे कामकाज नमूद केले आहे त्या पदास पात्र असलेल्या उमेदवारांनीच अर्ज करावे .

4.14.3.: दिव्यांग व्यक्तींसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्ये पैकी **4 %** पदे असतील .

4.14.4. दिव्यांग व्यक्तीची संबंधित संवर्ग/पदां करिता पात्रता शासना कडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशा नुसार राहील .

4.14.5. दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित पदांवर शिफारस करतांना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांका नुसार त्यांची शिफारस करण्यात येईल .

4.14.6. संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकारचे किमान 40% दिव्यांगाचे प्रमाणपत्र धारक उमेदवार/ व्यक्ती आरक्षण तसेच नियमानुसार अनुज्ञेय सोई/सवलतीसाठी पात्र असतील .

4.14.7. लक्षणीय दिव्यांगत्व असलेले उमेदवार / व्यक्ती खालील सवलतींच्या दाव्यास पात्र असतील .

अ ) दिव्यांगत्वाचे प्रमाण किमाण 40% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद लक्षणीय दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित असल्यास नियमानुसार अनुज्ञेय आरक्षण व इतर सोई-सवलती लागू राहतील .

ब) दिव्यांगत्वाचे प्रमाण किमाण 40% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद संबंधी दिव्यांग प्रकारासाठी सुनिश्चित केले असल्यास नियमानुसार अनुज्ञेय सोई सवलतीस पात्र असतील .

4.14.8. दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षणाचा फायदा घेउ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी शासन निर्णय , सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक अप्रकि-2018/प्रक्र-46/ आरोग्य-6/ दिनांक 14 सप्टेंबर 2018 मधील आदेशा नुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM संगणकिय प्रणाली व्दारे वितरित करण्यात आलेले नविन नमून्यातील दिव्यांगत्वाचे नविन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**5. <u>पदांच्या निवडीसाठी कार्यपध्दती आवश्यक कागदपत्रे तसेच महत्वाच्या अटी व शर्ती (सर्व उमेदवारांसाठी)</u>**

5.1.उपरोक्त मुख्यसेविका या पदांसाठी अर्ज केलेला उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व त्यांचे कडे महाराष्ट्र राज्याचे आधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

5.2. उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली व परिक्षेला बोलाविण्याने नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही .

5.3. सदरील पदे खुल्या प्रवर्गातून भरणे करिता शासन स्तरावरून मान्यता दिली असली तरी, सदरील निवडीने नियुक्ती ही मा.सर्वोच्च न्यायालयातील प्रलंबीत विशेष अनुमती याचिका क्र. 28306/2017 मधील न्यायनिर्णयाच्या अधीन राहून निवडीने देण्यात येणार आहेत . तथापी शासनाचे व या विभागाचे माहिती करिता मागास प्रवर्गातील उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांनी दिलेले जात प्रमाणपत्र (Cast Certificate) व जातवैधता प्रमाणपत्र (Validity Certifacate) सादर करण्यात यावे.

5.4 उमेदवारांनी परिक्षेसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल .परिक्षेसाठी नेमून दिलेल्या परीक्षा केंद्रावर दिलेल्या वेळेपुर्वी 1 तास अगोदर उपस्थित रहावे. परीक्षा केंद्रावर उशिराने पोहचणे , कोणत्याही कारणाने अनुपस्थित राहील्यास त्यांना पुन: परीक्षास बसणेची संधी देण्यात येणार नाही अथवा या आयुक्तालयास देण्यात आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही .

5.5 नियुक्ती होणाऱ्या उमेदवारास शासन निर्णय दिनांक 21.10.2005 नुसार लागू करण्यात आलेली नविन परिभाषीक अंशदायी निवृत्तीवेतन योजना (New Defined Contributory Pension Scheme) लागू राहील .त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम 1984 आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू राहणार नाही .तथापि सदर नियमात भविष्यात काही बदल झाल्यास त्या प्रमाणे योजना लागू राहील.

5.6. मुख्यसेविका निवडीने या संवर्गासाठी भरावयच्या रिक्त जागे करिता संपुर्ण राज्यात एकाच दिवशी एकाच वेळेस परिक्षा घेणेचे आयोजित करण्यात येणार आहे. त्या बाबत परीक्षा उमेदवारास परीक्षा पुर्व किमान 7 दिवस संबंधितांच्या इमेलवर परीक्षा केंद ठीकाण , बैठक क्रमांक, दिनांक व वेळ कळविण्यात येईल .

5.7 अंतिम निवड यादीतील पात्र उमेदवारांनी ऑनलाईन पध्उतीने सादर केलेल्या विविध प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती मुळ प्रमाणपत्रांच्या आधारे कागदपत्रे तपासणी करते वेळी तपासण्यात येतील .सदर प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती मुळ प्रमाणपत्रांच्या आधारे कागदपत्रे तपासणीच्या वेळी उपलब्ध करून देणे उमेदवारांना बंधनकारक राहील . त्या मधील प्रमाणपत्रे खोटी , चुकीची ,अपुर्ण व खाडा-खोड असलेली दिसून आल्यास संबंधित उमेदवारास कोणत्याही टप्यावर अपात्र ठरविण्यात येईल .

**6. पात्रता :**

6.1. भारतीय नागरीकत्व तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे .

6.2. **वयोमर्यादा : - उमेदवाराचे वयाची गणना ही 1 जानेवारी 2025 च्या दिनांकास गणण्यात येईल .**

6.3.. **मुख्यसेविका संवर्गासाठी किमान व कमाल वयो मर्यादा बाबत तपशिल खालील प्रमाणे -**

| अ.क्र. | प्रवर्ग | आवश्यक वयोमर्यादा |
|---|---|---|
| 1 | खुला तसेच दिव्यांग प्रवर्गातील सर्व उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन , महिला व बाल विकास विभाग,मंत्रालय मुंबई शासन अधिसुचना दिनांक 4 जून 2021 मधील तरतूदी नुसार किमान 21 वर्षापेक्षा कमी नसावे व 45 वर्षापेक्षा जास्त नसावे . |

**7. शैक्षणिक अर्हता व अनुभव :**

**7.1. निवडसुची वर्षामध्ये नमूद पदांसाठी अर्ज करणे कामी प्रसिध्दी .शासनाच्या दि.8 मे2023 च्या अधिसुचने नुसार दि. 1 जानेवारी 2025 रोजी उमेदवाराने पुढील प्रमाणे शैक्षणिक अर्हता पुर्णत: धारण करणे आवश्यक आहे.**

| अ.क्र. | पदांचे नांव | 1 जानेवारी 2025 रोजी अर्हता व अनुभव पात्रता | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| 1 | मुख्यसेविका / पर्यवेक्षिका | 1.संविधानिक विद्यापीठाची पदवी धारण करणारी कोणत्याही शाखेची पदवीधर उमेदवार | एस-13- रू.35400-112400 |
| 2 | | 2 अंगणवाडी सेविका या पदावर विनाखंड व नियमित 10 वर्षे सेवा पुर्ण व सद्यस्थितीत कार्यरत असणारे कर्मचारी पात्र असतील | |
| 3 | | 3. हिंदी व मराठी भाषा पास अथवा सूटीस पात्र | |
| 4 | | 4. एम.एस.सी.आय.टी. अथवा समकक्ष संगणक अर्हता पात्र | |

1) परीक्षा ही ऑनलाईन (Computer Based Test) पध्दतीने घेण्यांत येईल. परीक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील. प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक प्रश्नास 02 गुण ठेवण्यांत आलेले आहेत.

2) शासन निर्णय, महसुल व वन विभाग क्र. प्रनिमं-2009/प्र.क्र.356/ई-10, दि. 01/02/2010 मधील तरतुदीनुसार व सामान्य प्रशासन शासन निर्णय क्र. प्रनिमं1222/प्र.क्र.54/का.13-अ, दि. 04 मे, 2022 मधील तरतुदीनुसार या पदांकरिता मौखिक परिक्षा (मुलाखती) घेण्यांत येणार नाहीत.

3) महिला व बाल विकास विभाग शासन पत्र क्र.MWC-07011(12)19/2022-DESK-07 (E-587170) दिनांक 8 एप्रिल 2024 नुसार सामान्य प्रशासन विभाग , शासन निर्णय क्र. बीसीसी 2018/प्रक्र. 366 /16-ब दिनांक 7.5.2021 नुसार सर्व पदे खुल्या प्रवर्गातून भरख य त येणार असून सदरची निवडीने नियुक्ती ही मा. सर्वोच्च न्यालयातील प्रलंबीत विशेष अनुमती याचिका क्र. 28306/2017 मधील न्याय निर्णयाच्या अधिन राहून निवडीने नियुक्ती देण्यात येणार आहेत .

4) महाराष्ट्र शासन , महिला व बाल विकास विभाग शासन अधिसुचना दिनांक 8 मे 2023 नुसार गुणवत्ता यादीमध्ये अंतर्भाव करण्यासाठी उमेदवारांनी एकुण गुणांच्या किमान 50 टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

5) **परीक्षेचा निकाल (निवडसुची) तयार करतांना परिक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा प्राधान्यक्रम हा महाराष्ट्र शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. प्रानिमं1222/प्र.क्र.54/का.13-अ दि. 4 मे 2022 मध्ये आधारे क्रमवार लावला जाईल.**

6) परीक्षा ही Computer Based Test पध्दतीने घेण्यांत येणार असून एकापेक्षा जास्त सत्रात परीक्षा आयोजित केल्यास सत्र 1 व अंतिम सत्र यामधील प्रश्नपत्रिकेचे स्वरुप व त्याची काठिण्यता तपासण्यांत येऊन त्याचे समानीकरण (Normalization) करण्यात येईल. त्या बाबत TCS कंपनीकडून देण्यांत आलेले सूत्र वेबसाईटवर माहितीसाठी प्रकाशित करण्यात येईल . या बाबत निवड समितीने घेतलेले निर्णय सर्व परीक्षार्थी यांना बंधनकारक राहील, याची सर्व परीक्षार्थी यांनी नोंद घ्यावी.

7) **संलग्न अथवा (Upload) करावयाचे विहित कागदपत्रे / प्रमाणपत्रे**

| अ.क्र. | प्रमाणपत्र /कागदपत्र | प्रमाणपत्र /कागदपत्र |
|---|---|---|
| 1 | अर्जातील नावाचा पुरावा | आधार कार्ड, एस.एस.सी.प्रमाणपत्र, पॅनकार्ड,ड्रायव्हिंग लायसन, पासपोर्ट इ. |
| 2 | वयाचा पुरावा | जन्म नोंदणी दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, बोनफाईड प्रमाणपत्र |
| 3 | शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र | 10 वी, 12 वी / डिप्लोमा व संविधानिक विद्यापीठाची पदवी प्रमाणपत्र |
| 4 | मागासवर्गीय असल्याबाबतचा पुरावा | जात प्रमाणपत्र |
| 6 | नावात बदल झाल्याचा पुरावा | विहित नमून्यातील प्रमाणित गॅझेट प्रत |
| 7 | हिंदी व मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा | 10 वी प्रमाणपत्र |
| | संगणक ज्ञान पुरावा | एम.एस.सी.आय.टी. अथवा समकक्ष शासन प्रमाणित संगणक प्रमाणपत्र (मा.व तं.वि.सा.प्र.वि.शा.नि.4.2.2013) |
| 8 | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र | विहित नमूना प्रमाणपत्र |
| 9 | अनुभव प्रमाणपत्र | संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी (ना.प्र.) यांनी निर्गमित केलेले पदोन्ती पात्रता विहित नमूना प्रमाणपत्र |

*** वरील नमूद करण्यात आलेल्या पैकी पदोन्नतीस पात्र अंगणवाडी सेविका यांचा वयाचा पुरावा , शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र, हिंदी व मराठी भाषेचे प्रमाणपत्र पुरावा, संगणक ज्ञान पुरावा व अनुभवाचे प्रमाणपत्र यांची पडताळणी बाल विकास प्रकल्प अधिकारी संबंधित यांची जबाबदारी राहील .**

**सर्वसाधारण सूचना :-**

1) अर्ज फक्त ऑनलाइन प्रणालीव्दारेच स्विकारण्यांत येतील.
2) उमेदवारास मुख्यसेविका या पदासाठी फक्त एकच अर्ज सादर करता येईल.
3) अर्ज सादर करण्याकरिता संकेतस्थळ icds.gov.in राहील.
4) अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना icds.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
5) अर्ज भरण्याची अंतिम तारिख संगणका मार्फत निश्चित केली असल्याने दिलेल्या तारखेला व वेळेला बंद होणार आहे. त्यामुळे परिक्षार्थी उमेदवारांनी मुदतीतच अर्ज भरणे बंधनकारक राहील.

**9.1 परीक्षा केंद्र व परीक्षेबाबतच्या सर्वसाधारण सुचना :-**

9.1.1 अर्ज सादर करताना परीक्षा केंद्र एकच ठेवण्यात येणार असल्याने उमेदवारास दिलेले परीक्षा केंद्र बंधणकारक आहे.

9.1.2 परीक्षा केंद्र बदला बाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत अथवा कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

9.2.1 परीक्षा शुल्क (फी) : **सर्व प्रवर्गासाठी रू.1,000 प्रमाणे परीक्षा शुल्क आकारले जाणार आहे .**

**9.2.5 अर्ज सादर करण्याची प्रक्रिया / कालावधी :-**

| **अ.क्र** | **तपशील** | **विहित कालावधी** |
|---|---|---|
| 1 | ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा कालावधी | **दि. 30.04.2025 11.00 वा.पासून**<br>**ते**<br>**दि. 20.05.2025 23.55 वा.पर्यंत** |

**१०. दिव्यांग उमेदवार :- लेखनिक व अनुग्रह कालावधीबाबत :-**

१०.१. लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांना परिक्षेच्यावेळी लेखनिक व इतर सोयी सवलती उपलब्ध करून देण्यासंदर्भात शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक क्र.दिव्यांग२०१९/प्र.क्र २००/दि.कर,दिनांक ५ ऑक्टोबर २०२१ अन्वये जारी करण्यात आलेल्या लक्षणीय (Benchmark ) दिव्यांग व्यक्तींच्याबाबत लेखी परीक्षा घेण्याबाबतची मार्गदर्शिका -२०२१ तसेच तदनंतर शासनाचे वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार **लिहण्यासाठी सक्षम नसलेल्या व सक्षम प्राधिकारी यांनी प्रमाणित केलेल्या दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या मागणी प्रमाणे परिक्षेसाठी लेखनिक घेण्यासाठी परवानगी देण्यात येईल . तथापी लक्षणिय दिव्यांगत्व असलेल्या उमेदवरांनी लेखनिक / वाचक सहाय्यक आवश्यक असल्यास ज्या पदासाठी उमेदवार पात्रता परिक्षा देत आहे त्याच्या एक टप्याने कमी लेखनिक / वाचक सहाय्यक याची शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक राहील .तसेच मुख्य वैद्यकिय अधिकारी , जिल्हा शल्य चिकित्सक / वैद्यकिय अधिक्षक यांनी प्रमाणित केलेले Appendex-I प्रमाणपत्र सादर केल्या नंतर दिव्यांग परिक्षार्थीस लेखनिक / वाचक अथवा सहाय्यक नियुक्त करण्यास या आयुक्तालया मार्फत नियुक्त करण्यात आलेले परीक्षा केंद्र निरिक्षक हे परवानगी देतील .**

१०.२. प्रत्यक्ष परीक्षेच्या वेळी उत्तरे लिहिण्यासाठी फक्त सक्षम नसलेल्या, पात्र दिव्यांग उमेदवारांना, लेखनिकाची मदतीची आवश्यकता असल्यास संबेधित उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना त्याबाबत नमुद करणे गरजेचे आहे.. तसेच आवश्यक कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. संलग्न (Upload) करावयाच्या कागदपत्रांचा तपशील संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या "दिव्यांग उमेदवारांकरिता मार्गदर्शक सुचना" सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग , शासन निर्णय , दिव्यांग-२०१९/प्र.क्र.२००/ दिनांक ५ ऑक्टोबर २०२१ मधील तरतूदी नुसार राहतील . या करिता संबंधित दिव्यांग उमेदवाराने या आयुक्तालयाच्या icdest21@gmail.com या इमेलवर अवगत करण्यात यावे, म्हणजे संबंधित उमेदवारांना देण्यात येणाऱ्या सोई सुविधा बाबत योग्य ते निर्णय घेता येईल.

१०.३ लेखनिकाची व्यवस्था उमेदवारास स्वत: स्वखर्चाने करावी लागणार आहे .

१०.४ परिक्षे करीता लेखनिकाची मदत घेणाऱ्या उमेव्दारने "दिव्यांग उमेदवारांकरिता मार्गदर्शक सुचना" सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,शासन निर्णय, दिव्यांग-२०१९/प्र.क्र.२००/ दिनांक ५ ऑक्टोबर २०२१ नुसार APPENDIX-I, APPENDIX-II च्या विहित नमून्यात प्रमाणपत्रांची पुर्तता संबंधित उमदवाराने सादर करणे **बंधनकारक** आहे . उमेदवार स्वत: लेखनिकाची व्यवस्था केल्यास लेखनिकाची शैक्षणिक अहर्ता ज्या पदासाठी परिक्षा दिली जाणार आहे त्या शैक्षणिक अहर्ता या बाबतचे पुरावे संबंधित परीक्षा केंद्रावर मागणी केल्यास ते सादर करणे बंधणकारक राहतील, तसेच सदर वेळी खोटे पुरावे

दिले व  भविष्यात ते निदर्शणास आल्यास सदर उमेदवार कोणत्याही टप्यात त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल व त्यास संबंधित उमेदवार जबाबदार राहील.

१०.५ अर्जामध्ये दिव्यांग उमेदवारांची माहीती` नमूद न केल्यास व तशी परवानगी दिली जाणार नाही  तसेच आवश्यक कागदपत्रे संलग्न (Upload) न केलेस ऐनवेळी  लेखनिकाची मदत घेता येणार नाही.

१०.६ **मदतनिसाने दिव्यांग उमेदव्वारास केवळ प्रश्न वाचण्यास तसेच उमेदवाराचे उत्तर लिहण्यास मदत करणे अपेक्षित आहे. मदतनिसाने प्रश्न वाचून दाखविल्या नंतर उमेदवाराने सांगीतलेले उत्तरच विहित ठिकाणी चिन्हांकित (Marking) करणे आवश्यक आहे. ऑनलाईन परिक्षा दरम्यानलेखनिक स्वतंत्रपणे प्रश्नांची उत्तरे देत असल्याचे निदर्शणास आल्यास सदर उमेदवाराचे सत्र समाप्त केले जाईल आणि उमेदवारी रद्द केली जाईल .उमेदवाराने  सदर  शासन निर्णयामध्ये  दिलेल्या सुचनांचे पालन न केल्यास अथवा चुकीची माहिती दिल्यास / दिशाभूल केल्यास सदर उमेदवाराची नियुक्ती  कोणत्याही टप्यात  रद्द होण्यास पात्र राहील.**

11. **निवडसुचिची कालमर्यादा** :-

11.1. निवड समितीने तयार केलेली निवडसुची 1 वर्षासाठी किंवा निवडसुची तयार करताना ज्या दिनांका पर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांका पर्यंत, यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राह्य राहील. तद्नंतर ही निवडसुची व्यपगत होईल. भरती प्रक्रियेदरम्यान महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने भरती प्रक्रिया , निवडसूची, प्रतिज्ञासूची इत्यादीचे अनुषंगाने दिलेले निर्देश तथा सुचना किंवा सुधारणा यथा स्थितीत लागु राहतील.

11.2 निवड समितीने तयार केलेल्या निवडसुचीमधुन ज्येष्ठतेनुसार उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस केलेला उमेदवार सदर पदावर विहित मुदतीत रूजू न झाल्यास किंवा संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार, किंवा जात प्रमाणपत्र / अन्य आवश्यक प्रमाणपत्रांची अनुपलब्धता/ अवैधता किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळुन आल्यास अथवा शिफारस केलेला उमेदवार रूजू झाल्यानंतर नजिकच्या कालावधीत त्याने राजीनामा दिल्यामुळे किंवा त्याचा मृत्यु झाल्याने पद रिक्त झाल्यास,अशी पदे त्या त्या प्रवर्गाच्या निवडसुचीतील प्रतिक्षा यादीतील उमेदवारामधुन निवडसुचीच्या कालर्मयादेत वरिष्ठते नुसार उतरत्या क्रमाने भरण्यात येतील. तथापि, भरती प्रक्रिये दरम्यान महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने भरती प्रक्रिया, निवडसुची , प्रतिक्षासुची इत्यादीचे अनुषंगाने दिलेले निर्देश तथा सूचना किंवा सुधारणा यथास्थितीत लागू राहतील.

12.1 **उमेदवारांना समान गुण मिळाल्यास** सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. प्रानिमं1222/प्र.क्र.54/का.13-अ दि. 4 मे 2022 मध्ये आधारे क्रमवार लावला जाईल. परिक्षेचा निकाल तयार करताना, परिक्षेत ज्या पात्र उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीमधील प्राधान्यक्रम पुढील प्रमाणे निश्‍चित करण्यात येईल .

12.2 समान गुणप्राप्त उमेदवारांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य असेल अथवा वरील अनु.क्र.(अ) नुसार एकापेक्षा अधिक उमेदवार समान गुणप्राप्त असतील तर त्यापैकी वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

12.3 वरील अनु.क्र.(अ) व (ब) या दोन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतर शैक्षणिक अर्हता ( पदव्युत्तर पदवीधर, पदवीधर, उत्तीर्ण अशा प्रकारे ) धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

12.4 वरील अनु.क्र.(अ) (ब) (क) या तिन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवाऱ्यांच्या बाबतीत, सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये विहित असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चत्तम गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल..

13. **सेवा प्रवेशोत्तर शर्ती** :-

13.1 मुख्यसेविका या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीस सेवा नियमानुसार आवश्यक अर्हता सेवाप्रवेशोत्तर परिक्षा  विहित वेळेत  व विहित  संधीमध्ये उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. किंवा प्रचलित नियमानुसार सेवाप्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण होण्या पासून  सूट मिळणे आवश्यक राहील .

13.2 जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय परिक्षा / सेवा प्रवेशोत्तर परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या  नियमानुसार विभागीय / व्यावसायिक परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

13.3. मुख्यसेविका  या पदावर नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कूटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 मधील तरतूदी नुसार व त्या बाबत वेळोवेळी करण्यात येणाऱ्या नियमानुसार नियुक्तीच्या वेळी लहान कूटूंबाचे प्रमाणपत्र सादर करणे बंधणकारक राहील . अन्यथा सदर व्यक्ती शासकिय सेवेसाठी अपात्र ठरेल .

13.4 मुख्यसेविका  या पदावर नियुक्त होणाऱ्या महिला  महाराष्ट्र राज्यात कोठेही व कोणत्याही प्रकल्प कार्यालयात नियुक्ती अथवा बदलीस पात्र राहतील .

13.5  मुख्यसेविका म्हणून निवड झालेल्या उमेदवारास पायाभूत व उजळणी प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण करणे आवश्यक राहील

13.6 उमेदवाराची मुख्यसेविका या पदावर नियुक्ती झाल्यास शासनाने वेळोवेळी दिलेल्या सुचना व आदेश संबंधित उमेदवारास बंधनकारक राहतील.

**14. प्रवेश प्रमाणपत्र :-**

14.1 परीक्षेस प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेश प्रमाणपत्रे ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळावर उमेदवाराच्या प्रोफाईल व्दारे परिक्षेपूर्वी सर्वसाधारनपणे किमान 8 ते 10 दिवस अगोदर उपलब्ध करुन देण्यांत येईल.त्याची प्रत **परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परिक्षेच्या वेळी कलर छायांकित प्रत 3 प्रतीत सादर करणे आवश्यक आहे.**

14.2 **परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वत:चे प्रवेश प्रमाणपत्र सोबत आणणे व ते कलर झेरॉक्स असणे सक्तीचे आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.**

14.3 प्रवेश प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यांत आल्यानंतर उमेदवाराला त्याच्या अर्जात नमूद नोंदणीकृत इमेल व मोबाईल क्रमांकावर लघुसंदेशाव्दारे कळविण्यांत येईल.याबाबतची घोषणा icds.gov.in संकेतस्थळावर परीक्षेपूर्वी एक आठवडा अगोदर प्रसिध्द करण्यांत येईल.

14.4 परीक्षेच्या दिनांकापूर्वी तीन दिवस अगोदर प्रवेश प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास अर्ज सादर केल्याच्या आवश्यक पुराव्यासह icds.gov.in या संकेतस्थळावरील जाहीर/ प्रसिध्द केलेल्या हेल्प लाईन क्रमांकावर संपर्क साधावा .

14.5 **परीक्षेच्या वेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र ,पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसेन्स यापैकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र तसेच मूळ ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.**

14.6 आधारकार्डच्या ऐवजी भारतीय विशिष्ट ओळखपत्र प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड केलेले ई-आधार सादर करणा-या उमेदवारांच्या बाबतीत ई-आधार वर उमेदवारांचे नांव, पत्ता,लिंग,फोटो, जन्मदिनांक या तपशीलासह आधार निर्मितीचा दिनांक (Date of Aadhar Generation) व आधार डाऊनलोड केल्याचा दिनांक असल्यास तसेच सुस्पष्ट फोटोसह रंगीत प्रिंटमध्ये आधार डाऊनलोड केले असल्यास ई-आधार वैध मानण्यांत येईल.

14.7 **नावामध्ये बदल केलेल्या असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहित स्त्रिया यांच्या बाबतीत ) नावात बदल झाल्यासंबंधीत अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावांत बदल झालेल्या संबंधीचा दाखला व त्याची छायांकित प्रत परिक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.**

15. **परीक्षेस प्रवेश** :- संबंधित परीक्षेच्या प्रवेशप्रमाणपत्रावर नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून उमेदवारांना परीक्षेच्या उपस्थितीसाठी पात्र समजण्यांत येईल. तथापि परिक्षा सुरु होण्यापूर्वी नेमून दिलेल्या केंद्रावर दिलेल्या वेळेपूर्वी 1 तास अगोदर ओळखपत्र तपासणीची पूर्तता करण्यासाठी उपस्थित रहावे लागेल.

15.1 कोणत्याही परिस्थितीमध्ये अन्य ओळखपत्राच्या आधारे तसेच परीक्षा सुरु होण्यापुर्वी हजर होणे बाबतच्या दिलेल्या वेळेनंतर उमेदवारास परीक्षा केंद्रावर कोणत्याही प्रकारे व कोणत्याही परिस्थितीत प्रवेश दिला जाणार नाही व अशा **उमेदवारांना पुनर्रपरीक्षा देण्याची कोणतीही व्यवस्था केली जाणार नाही.**

15.2 या विभागाचे icds.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत आलेली माहिती / जाहिरात व देण्यात आलेल्या सूचना अधिकृत समजण्यांत येईल. करिता वेळो वेळी उमेदवाराने संकेत स्थळावरील सुचनांचे अवलोकन करण्यात यावे .परिक्षा संबंधी कांही संदेश द्यावयाचा असल्यास त्या बाबत व्यक्तीश: स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही .

15.3 सदर जाहिरात शासनाच्या icds.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

16. **विशेष महत्वाच्या सूचना :-**

16.1. कार्यालयांत परिक्षा कक्षात परीक्षा केंद्राच्या परिसरात मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रानिक्स साधने आणण्यांस व वापरण्यांस सक्त मनाई आहे.

16.2 प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रते संदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस / नियुक्तीसाठी विचार करण्यांत येणार नाही.

16.3 परीक्षे करिता येणाऱ्या परीक्षार्थीस प्रवासभत्ता वा इतर कोणत्याही प्रकारचा भत्ता दिला जाणार नाही . उमेदवाराने स्वत:च्या खर्चाने दिलेल्या परिक्षा केंद्रावर उपस्थित रहावयाचे आहे .

16.4 अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या तारखेला उमेदवाराचे वय दिनांक 1 जानेवारी 2025 रोजी 21 वर्षे पूर्ण झालेले नसल्यास व वय वर्ष 45 च्या वर असल्यास निवड प्रक्रिये करीता अपात्र समजण्यात येईल.

16.5 उमेदवारास गैरवर्तणूकीच्या कारणास्तव नगरपरिषद किंवा कोणतेही स्थानिक प्राधिकार किंवा कोणतेही शासन यांनी सेवेतून बडतर्फ केले असल्यास निवड प्रक्रिये करीता अपात्र समजण्यात येईल.

16.6 शासनाच्या कोणत्याही विभागाच्या नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मते उमेदवार नैतिक अध:पतन या गुन्ह्याखाली दोषी आढळून आल्यास निवड प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्यावर सदर उमेदवारास अपात्र समजण्यात येईल.

16.7 महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून किंवा संघ लोकसेवा आयोगाकडून कोणत्याही कारणास्तव प्रतिरोधित केलेल्या उमेदवारांना प्रतिरोधनाच्या कालावधीमध्ये कोणत्याही निवड प्रक्रियेकरीता अपात्र समजण्यात येईल. तसेच सदर उमेदवारांने या बाबतची

माहिती लपवून परीक्षेस बसला व निवड झाली तरी कोणत्याही निवड टप्यामध्ये त्याची उमेदवारी रद्द होण्यास पात्र राहील .

16.8 अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास प्रतिरोधनाचा कालावधी गणण्यात येईल.

16.9 **मुख्यसेविका या पदावर निवड झाल्यानंतर एक महिन्याच्या आत वैद्यकिय पात्रता प्रमाणपत्र** (Certifiate Of Medical Fitness) **पोलिस तपासणी अहवाल** (Police Verification Certificate) **प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर मा.सर्वोच्च न्यायालयातील प्रलंबीत विशेष अनुमती याचिका क्र.** 28306/2017 **मधील न्यायनिर्णयाच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरूपात निवडीने नियुक्त्या देण्यात येतील.**

16.10 उमेदवारी संदर्भातील कोणत्याही तरतुदी शासन अथवा आयुक्तालया व्दारे कोणत्याही क्षणी पूर्वलक्षी प्रभावाने बदलण्याची शक्यता असते. सदर बदल आवश्यकतेनुसार निदर्शनास आणण्यात येतील व ते संबंधितांवर बंधनकारक असतील असे बदल, प्रसिद्धी पत्रक इत्यादी सर्वसाधारणपणे आयुक्तालयाच्या icds.gov.in संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील.

16.11 **शासनाने त्याच प्रमाणे मा.अध्यक्ष, राज्य स्तरीय निवड समिती यांनी वेळोवेळी घेतलेले निर्णय संबंधितावर बंधनकारक राहतील .परीक्षेच्या अनुषंगाने आवश्यक ती अद्ययावत माहिती / सद्यस्थिती करीता उमेदवाराने वेळोवेळी या आयुक्तालयाच्या संकेतस्थळाचे अवलोकन करणे आवश्यक आहे.**

*************************************************************************************

**परिशिष्ट -1**

महाराष्ट्र शासन ,महिला व बाल विकास विभाग शासन अधिसुचना दिनांक 8 मे 2023 नुसार एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय यांचे अधिनस्त मुख्यसेविका या पदांसाठी मर्यादित विभागिय परिक्षेव्दारे निवडीने नियुक्ती करिता परिक्षा नियमावली अन्वये सर्व पात्र उमेव्दारांची लेखी परिक्षा एकाच वेळी घेण्यात येईल.या करिता एकूण 200 गुणांचे वस्तुनिष्ठ स्वरुपाची (Objective) पेपर असेल व प्रत्येक प्रश्नास दोन गूण असतील सर्वसाधारण परिक्षा स्वरूप खालील प्रमाणे

| पेपर | विषय | स्तर | माध्यम | प्रश्न संख्या | गुण | वेळ | परिक्षेचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण विषय | इंग्रजी | 10 वी | इंग्रजी | 10 | 20 | 1.30 - दीड तास (दिव्यांग उमेव्दारा करीता 2.00 दोन तास.) | वस्तूनिष्ठ व बहूपर्यायी प्रश्न |
| | मराठी | 10 वी | मराठी | 20 | 40 | | |
| | सामान्य ज्ञान, संख्यात्मक आणि तर्कशुध्द चाचणी | 12 वी | मराठी | 40 | 80 | | |
| | महिला व बाल विकास आयुक्तालयांतर्गत अंमलबजावणी करण्यात येत असलेले कायदे व योजना | पदवी | मराठी | 30 | 60 | | |
| | | | | 100 | 200 | | |

**परिशिष्ट -2**

**निवडीने भरावयाच्या रिक्त पदांचा तपशील खालीलप्रमाणे - 100 % महिलांसाठी**

| अ.क्र | प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | सा.शै. मा. प्रवर्ग | आ.दु. घ. | अ राखीव पदे | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **खुल्या प्रवर्गातून भरावयाची पदे** | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | **261** | **261** |
| | दिव्यांग (4%) | 1) LV, 2) OA, LC, 3) AAV, 4) MD **क्रमानुसार भरण्यात येतील** | | | | | | | | | | 11 | 11 |
| | | **एकूण भरावयाची पदे ------** | | | | | | | | | | **272** | **272** |

## परिशिष्ट -3

मुख्यसेविका गट-क या संवर्गातील दिव्यांग प्रवर्गा करिता एकूण 11 पदे आरक्षित असून सदर पदाकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवाराने खालील नमूद प्रकार , शारिरिक पात्रता व पदांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या विचारात घेउन अर्ज करणे आवश्यक राहील.

| संवर्ग | भरावयाची पदे | पात्र दिव्यांगाचा प्रकार | शारिरिक पात्रता | कर्तव्य व जबाबदाऱ्या |
|---|---|---|---|---|
| मुख्यसेविका | 11 | 1) LV<br>2) OA, LC<br>3) AAV<br>4) MD | S<br>ST<br>W<br>L<br>MF<br>RW<br>H<br>C<br>SE | 1.अंगणवाडी सेविकांच्या कामाचे पर्यवेक्षिकां कडून पर्यवेक्षण करणे . नागरी भागातील 25 अंगणवाड्यांसाठी एक मुख्यविका /पर्यवेक्षि का असेल तसेच तिच्या जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे असतील.<br>अ-पर्यवेक्षिका संबंधित अंगणवाडी सेविकांसह अंगणवाड्यांचा कार्यक्रम आखतील;<br>ब- अंगणवाडी सेविकांना क्षत्रीय समस्या निवारण करणे,<br>क-कुटुंबांची यादी तयार करणे, लोकसंख्येचे लक्ष्य गट ओळखणे यासाठी मदत आणि मार्गदर्शन करेल.<br>ड-सर्व जन्म आणि मृत्यूच्या नोंदी अद्ययावत ठेवणे .<br>2.त्यानंतर ती कुपोषित आणि आजारी बालकांची ओळख पटवणे, मुलांचे योग्य वजन करणे आणि वजनकार्डवर त्यांचे वजन योग्यरित्या लिहिणे, साधी औषधे व प्रथमोपचार देणे, गंभीर कुपोषित व आजारी बालकांना PHC मध्ये पाठवणे, आणि आरोग्य केंद्रात अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे नियंत्रण व त्यांना मार्गदर्शन करणे .<br>3.पूरक पोषण आहार कार्यक्रम तीन महिन्यातून एकदा बीट स्तरावर नियमित क्षेत्रीय भेटीद्वारे अंगणवाडी केंद्रांच्या कामकाजावर देखरेख आणि मार्गदर्शन करेल आणि अशा प्रकारे महिन्यातून सुमारे 20 दिवस दौरा करेल.<br>4.ICDS योजनेच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी आणि क्षेत्रीय समस्या आणि त्यांचे निराकरण यावर चर्चा करण्यासाठी ती नियमितपणे तिच्या नियंत्रणाखाली आणि देखरेखीखाली असलेल्या अंगणवाडी सेविकांशी महिन्यातून किमान एकदा, प्रकल्प मुख्यालयात किंवा तिच्या स्वतःच्या क्षेत्रीय मुख्यालयात किंवा अंगणवाडी केंद्रांवर नियमितपणे बैठका आयोजित करेल:<br>5. अंगणवाडी सेविकांना कौटुंबिक संपर्क वाढवणे, गृहभेटी घेणे, वार्डातील /गावातील सभा घेणे इ.<br>6. वेळोवेळी अंगणवाडीतील सर्व नोंदी, रजिस्टर्स, रोख आणि खाती, साठा आणि साहित्य तपासेल आणि अंगणवाडी सेविकांना या संदर्भात आवश्यक सूचना आणि सूचना देईल आणि अंगणवाडी सेविकांकडून मासिक प्रगती अहवाल नियमितपणे सादर करण्याची खात्री करेल:<br>7. साधे आणि शिक्षित आरोग्य आणि पोषण शिक्षण संदेश तयार करेल, प्रचार सामग्रीचा वापर करेल आणि आरोग्य आणि पोषण शिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यासाठी अंगणवाडी सेविकांना मदत आणि मार्गदर्शन प्रदान करेल:<br>8. त्याचप्रमाणे, ती अंगणवाडी सेविकांना कार्यात्मक साक्षरता वर्ग आयोजित करण्यात मदत करेल आणि मार्गदर्शन करेल त्यांच्या भेटींमध्ये वर्गांना गुंतवून, योग्य शैक्षणिक साहित्य प्रदान करून आणि कार्यात्मक साक्षरता घटक समृद्ध करण्यासाठी इतर कार्यकर्त्यांची मदत आणि समर्थन मिळवून देईल<br>9. ती एकीकडे अंगणवाडी सेविका आणि CDPO तसेच अंगणवाडी सेविका आणि PHC कर्मचारी, विशेषत: L.HVs यांच्यात संपर्क व संमन्वय करणे .<br>10. ती अंगणवाडी सेविकांना स्थानिक स्तरावरील समित्यांची निर्मिती आणि कामकाजात मदत करेल आणि मार्गदर्शन करेल आणि महिला मंडळे एकत्रित करेल आणि प्राथमिक शाळांशी जवळचे संबंध प्रस्थापित करेल; आणि बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्या मार्फत शासनाच्या बाले व महिला यांचेशी निगडीत सर्व योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी सहायक म्हणून कार्य करेल.<br>(या संदर्भात अधिक माहितीसाठी महिला व बाल विकास विभाग शासन नि.क्र.एबावि-2009/प्रक्र.135/का-5/मंत्रालय मुंबई 5 जानेवारी 2010 चा शासन निर्णय पहा.) |

A- 1) LV- Low Vision , 2) OA, LC - One arm , Leprosy Cured , 3) AAV - Acid Attack Victim , 4) MD - Multiple Disablity

B- 1) S - Sitting , 2) ST - Standing 3) W - Walking 4) L - Lifting 5) MF - Manupulation by Fingers 6) RW - Reading and Writing 7) H - Hearing 8) C - Communication 9) SE- Seeing .

**स्वाक्षरित /-**
**कैलास पगारे,** (भा.प्र.से.)
**आयुक्त**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना,**
**महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई**

**प्रत** - 1. मा. सचिव, महिला व बाल विकास विभाग , मंत्रालय मुंबई .यांना माहितीस्तव सविनय सादर .

2. विभागीय उप आयुक्त , महिला व बाल विकास, कोकण, पुणे, नाशिक, छ.संभाजीनगर, अमरावती व नागपूर विभाग यांना कार्यवाहीस्तव अग्रेषित.

**मा. आयुक्त महोदय यांची स्थळ प्रतीवर स्वाक्षरी असे .**

सहाय्यक आयुक्त (प्रशासन)
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना,**
**महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई**